# ८. यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार



**मोहिते दिगंबर तुळशीदास**

सहाय्यक प्राध्यापक, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

**प्रस्तावना**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यश चव्हाण यांच्या विषयी महाराष्ट्रीयन जनतेच्या मनात श्रद्धा,आदर आणि प्रेम आहे. त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी आणि त्या निर्णयामुळेच आधुनिक महाराष्ट्र घडला, राष्ट्रीय पातळीवरही त्यानी आपल्या कर्तुत्वाने अनेक क्षेत्रे पदाक्रांत केली. यामध्ये प्रा संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री या खात्याचे कामकाज त्यांनी पाहिले. त्याचसोबत त्यांच्या सूसंस्कृत व्यक्तिमत्त्यामुळेच त्यांच भारताचे उपपंतप्रधान पदही चालून आले.

यशवंतराव चव्हाण हे फक्त राजकारणी नव्हते तर ते साहित्यिक देखील होते त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहे बहुरंगी व्यक्तिमत्व लाभलेल्या यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार या शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

कोणत्याही विचारवंताच्या विचारांवर कोणत्यातरी तत्त्वाचा प्रभाव असतो अगदी त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाणांवर दे समाजवादी विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते अर्थात हे समाजवादी विचार पाहण्यापूर्वी समाजवाद म्हणजे काय? त्यांची व्या पाहणे महत्त्वाचे आहे.

**समाजवाद**

संपत्तीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेवून सर्वांना समान मानणारी व संपत्तीचे न्याय्य वितरण करून सर्वांना एकाच स पातळीवर आणणारी विचारप्रणाली म्हणजेच समाजवाद होय.[1]

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा पाया त्यांच्या शालेय जीवनातच घातला गेला. यशवंतराव चव्हाण समाजवाद, गांधीवाद आणि मार्क्सवादाचा प्रभाव होता. यशवंतरावांची समाजवादासोबतची ओळख शालेय जीवनतच झाली. महा गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ देशात सुरू केल्यानंतर त्या चळवळीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी शालेय जीवनातच मारली आणि कराडमध्ये प्रभात फेऱ्या, झेंडावंदन इत्यादी कार्यक्रम घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. अटकेच्या दरम्यान यशवंतरावांवर समाजवादाचा प्रभाव पडला कम्युनिस्टांचा जाहीरनामा भुस्कुटे यांच्याकडून यशवंतरावांना वाचावयास मिळाला.[2]

यशवंतराव चव्हाण आपल्या आत्मचरित्रात कृष्णाकाठ भाग एक मध्ये येरवडा येथील तुरुंगातील आठवणींची माहिती देताना सांगतात की ,गाधीवादाच्या चर्चेबरोबर समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सुरू झा आणि त्याच पोषक असे वाडमयही आंम्हा लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने नियमि सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे आणि काय वाचू नये असे वाटावे इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला होता.[3]

एम जोशी. ह. रा. महाजनी ही तरुण मंडळी गांधीवाद स्वीकारलेल्यांपैकी दिसत नव्हती त्यांच्या मनात त्यासंबंधी अनेक शंका होत्या व ते त्यावेळी विचारत असत स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का? असे प्रश्न उभे करीत आणि त्याचे हे प्रश्न बरोबर आहे असे मला वाटे.[3]

समाजवादा संदर्भात यशवंतराव एका भाषणात म्हणतात की, समाजवादाच्या तीन विशेष निकष असतात पहिला हा की, सर्वांना विकासाची समान संधी मिळाली पाहिजे सगळेजण कायद्यासमोर समान आहेत एवढे म्हणून भागत नाही देशाच्या आर्थिक समृद्धीमध्ये हातभार लावण्याची आणि या समृद्धीचा उपभोग घेण्याची प्रत्येकाला खऱ्या अर्थाने समान संधी उपलब्ध झाली पाहिजे. जीवनमानातील विषमता नाहीशी करणे हा समाजवादाचा दुसरा निकष आहे. जीवनमान म्हणजे केवळ आर्थिक जीवन नव्हे, सामाजिक जीवनही त्यात अंतर्भूत असते उत्पादनाच्या प्रक्रियेतील शोषण थांबविणे. ही समाजवादाची तिसरी अट आहे. हे तीनही निकष आपापल्या परीने महत्त्वाचे असले, तरी आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणे. हा समाजवादाचा गाभा म्हटला पाहिजे म्हणून आपण येत्या पाच दहा वर्षांमध्ये ही विषमता निपटून काढली पाहिजे तरच आपली समाजवादाच्या दिशेने खरीखोरी वाटचाल चालू झालेली आहे असे म्हणता येईल.[4]

वरील विवेचनावरून संभवत: असे वाटणे शक्य आहे की, यशवंतरावांनी समाजवादाचा पूर्णपणे स्वीकार केला होता परंतु असे आपणास म्हणता येत नाही त्याचे कारण गोविंद तळवलकर त्यांच्या यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व या ग्रंथात यशवंतरावांचा सामूहिक शेतीला असणारा विरोध स्पष्ट करताना म्हणतात की, यशवतरावांनी समाजवादी विचारांचा अभ्यास केला होता आणि त्यातील काहींचा त्यांच्यावर प्रभाव होता. मार्क्सवादाचा व त्यातही सोवियत युनियनने आर्थिक नियोजनाने जे स्वरूप स्वीकारले होते त्याच्या आकर्षणामुळे पंडित नेहरूंनाही काही काळ विशेष प्रभावीत केले होते यामुळे सामूहिक शेतीचा प्रयोग निदान मर्यादित क्षेत्रात प्रथम करून पाहण्याची त्यांची कल्पना होती. काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात तसा ठराव आणण्यात आला चौधरी चरण सिंग यांनी या ठरावास विरोध केला. पण ठराव मंजूर झाला तथापि चरणसिंह जे उघड बोलले ते अधिवेशनास जमलेल्या बहुसंख्य काँग्रेस जनांचे मत होते. यामुळे ठराव संमत झाला असला तरी कोणीही तो अंमलात आणणार नाही. हे इंदिरा गांधींनी मात्र ओळखले होते. असे इंदूर मल्होत्रा यांनी त्यांच्या इंदिरा गांधींच्या चरित्रात म्हटले आहे. इंदिरा गांधींनी बघितले होते की, उत्तर भारत, ओरिसा इत्यादी राज्यातल्या जमीनदारांच्या मालकीच्या जमिनी कमी करून तुम्ही जमीन सुधारणा करण्याच्या कामी राज्य सरकारातील काँग्रेसजन विरोध करत आहेत. यशवंतरावांना सामूहिक शेतीची कल्पना अव्यवहारी वाटत होती. महाराष्ट्रात उत्तरे प्रमाणे जमीनदारी नव्हती तेव्हा तिकडच्या काँग्रेस जणांशी यशवंतरावांच्या जमणारे नव्हते. तरी त्यांना सामूहिक शेतीची योजना अव्यवहार्य वाटत होती कारण ग्रामीण भागात वाढल्यामुळे शेतकऱ्यांची सर्वात मोठी आकांक्षा स्वतःच्या मालकीची जमीन असणे ही असल्याची त्यांना जाणीव होती .म्हणून आपण सामूहिक शेतीचा पुरस्कार करत नाही. असे त्यांनी म्हटल्याचे आढळेल.[5]

**गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या संदर्भातील यशवंतराव चव्हाण यांची मते**

ग्रामीण भागाचा विकास करण्याचा विचार करताना यशवंतराव ग्रामोद्योग, स्वयंपूर्ण खेडी, ग्रामस्वराज्य अशा गोष्टी करताना दिसत नाहीत. तसेच सरसकट कारखानदारी निर्माण करणे शक्य नसल्याचे कल्पना त्यांना होती. यामुळे महात्मा गांधींच्या राजकीय नेतृत्वापासून प्रेरणा घेऊनही यशवंतरावांनी ग्रामोद्योगाचा पुरस्कार केला नाही. याचा अर्थ ग्रामीण उद्योग त्याज्य मानले असा नव्हे पण हे सर्व आधुनिक शास्त्र व तंत्र यांच्या आधारे केल्याशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा होती याबाबतीत पंडित नेहरू सारखी

त्यांची भूमिका होती. ए बंच ऑफ लेटर्स या नावाच्या नेहरूंचा पत्राचा संग्रह आहे. त्यात त्यांना आलेली व त्यांनी लिहिलेली असून काही गांधीजींना लिहिलेली आहेत. एकादा नेहरूंनी गांधीजींना सरळच लिहिले आहे की, खेड्यात काही स्वयंपूर्ण आहे असे आपणास वाटत नाही. त्याचे जीवन आधुनिक यंत्रसामग्रीने सुधारण्याचे गरज आहे. या सर्व यंत्र तंत्रांचा उपयोग लोकांच्या सुखासाठी न होता सर्व समाजासाठी झाला पाहिजे हा आग्रह रास्त आहे पण या सर्वांना निरोप देण्यात काहीच हित अशी नेहरूंची धारणा होती यशवंतरावची ही तशीच होती.[6]

### सहकार क्षेत्राविषयी मत

'महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदे'त सहकार चळवळी विषयी भाष्य करताना यशवंतराव चव्हाण म्हणतात उद्योगधंद्यात सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमात आणि विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगात, सहकारी संघटनेला महत्त्व आहे. उद्योगधंद्याची सहकारी तत्त्वावर कशी परिणामकारक संघटना होऊ शकते, हे या राज्याने दाखवून दिले आहे. याबाबतीत या राज्याने इतरांना अल्पशा प्रमाणात का होईना, पण मार्गदर्शन केले आहे व ते तसे आजही करीत आहे. असे मी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या या प्रक्रिया करण्याच्या धंद्यांना आर्थिक बाजूपेक्षा एक वेगळी अशी महत्त्वाची सामाजिक बाजूही आहे आणि त्याच बद्दल मी आता बोलणार आहे.

सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नावर आधारलेली असली तरी सरकारही तिचे फार काळजीपूर्वक संगोपन करीत आहे. याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी पहिले कारण असे की, शेतकऱ्याला उद्योग धंद्यात पैसे गुंतवण्यास लावण्याचा जवळजवळ हाच एक मार्ग आहे. दुसरे म्हणजे, ग्रामीण भागातील स्थानिक साधनसामग्रीचा प्रयोग करण्याच्या निमित्ताने बाहेरून येणाऱ्या भांडवलामुळे त्या भागात जे प्रश्न निर्माण होतात ते त्यामुळे टाळता येतात. शिवाय, त्याने ग्रामीण व शहरी मूल्यांक असलेले अंतर नष्ट होऊन शहरातील व खेड्यातील लोक एका पातळीवर येतात. उदाहरणार्थ, एकदा सभेत मोठ मोठे उद्योगपती, कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी, सरकारी अधिकारी, तंत्रज्ञ व इंजिनियर यांच्या बरोबरीने शेतकऱ्यांचे प्रतिनिधी ही जेव्हा डायरेक्टर म्हणून खांद्यास खांदा लावून बसतात तेव्हा ग्रामीण व शहरी हा भेद साहजिकच नष्ट होतो. याशिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारे वाढलेले उत्पन्न सहकारी संघटनेमुळेच शक्य तितक्या जास्त क्षेत्रात वाटले जाते व त्यामुळे खऱ्या अर्थाने समाजवादी समाज रचनेचा उद्देश्य साध्य होतो.[7]

महाराष्ट्राच्या आजच्या आर्थिक विकासातील सहकार चळवळीचे महत्त्व यशवंतराव चव्हाण यांनी पन्नास वर्षांपूर्वी ओळखले होते असे आपणास दिसून येईल.

### भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे व अधिकारांबाबतची मते

भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे आणि खास अधिकार हेही काढून घ्यायला हवेत. कारण हे संस्थानिक जुन्या सरंजामशाहीचे अवशेष असून अशा कालबाह्य अवशेषांना समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये स्थान असू शकत नाही. संस्थानिकांचे तनखे आणि खास हक्क काढून घेण्याबाबत आत्तापर्यंत भरपूर चर्चा झालेली आहे. याबाबत माझी भूमिका अशी आहे, की आपण हा प्रश्न शक्य तितका वाटाघाटी करून सोडवावा. कारण त्यामुळे कटुता निर्माण होणार नाही. मात्र येथे एक गोष्ट केली पाहिजे. संस्थानिकांचे तनखे आणि हक्क नाहीसे करण्याच्या निर्णयाबाबत तडजोड होऊ शकत नाही. आमचा पक्ष त्याबाबतीत खंबीर भूमिकेवर ठाम उभा आहे. म्हणून लवकरच आम्ही संसदेपुढे तसे विधेयक सादर करणार आहोत. संस्थानिक अजूनही खळखळ करीत आहेत. काही घटनात्मक तरतुदींची सभा पुढे करून स्वतःचा बचाव करू पाहत आहेत. मला त्यांची अडचण समजू शकते. परंतु काळ बदलला आहे

इतिहासाचा संदर्भ बदलला आहे. इतिहासाची अपेक्षा बदलली आहे. ही वस्तुस्थिती भूतपूर्व संस्थानिकांनी समजावून घेतली, तर राष्ट्रीय जीवन प्रवाहामध्ये सहभागी होण्याची ही संधी ते दवडणार नाहीत, अशी मला आशा आहे.[8]

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतापुढील संस्थानिकांच्या विलीनीकरणाचा प्रश्न जसा महत्त्वाचा होता, तसाच तो आर्थिक दृष्ट्या संस्थानिकांच्या तनखे व खास अधिकाराचा देखील होता याबाबतीत यशवंतराव चव्हाणांनी ठाम मत व्यक्त केले होते. त्यामुळेच नंतर संस्थानिकाचे खास अधिकार व तनखे बंद करण्यात आले व खऱ्या अर्थाने संस्थानिक भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार वागू लागल्याचे आपल्याला दिसून येईल.

**जमीनधारणा**

शेतीचा विचार करीत असताना जमीन धारणेचा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. याबाबतीत गेल्या वीस वर्षामध्ये आपण फारसे काही साध्य करू शकलो नाही, हे कटू सत्य मान्य केलेच पाहिजे. तसे पहिले, तर या प्रश्नाचा विचार आपण अलीकडेच करू लागलेलो आहोत, असे मुळीच नाही. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीही कॉंग्रेस पक्षाने जमीनदारी निर्मूलनाचा कार्यक्रम पुरस्कारिला होता. त्या काळातही काही राज्य सरकारांनी जमीनधारणे संबंधी कायदे केले होते. 1937 मध्ये तेव्हाच्या मुंबई सरकारने कुळांच्या हक्कांचे संरक्षण करणारे विधेयक मांडले होते. नंतर इतर राज्यांनीही तशा प्रकारचे कायदे केले. परंतु या कायद्यांच्या अंमलबजावणीचे गेल्या वीस वर्षातील चित्र काय दिसते ? शेत जमीन कसणाऱ्याच्या मालकीची झाली पाहिजे हे तत्व मान्य झाले आहे. तसे कायदेही करण्यात आलेले आहेत आणि तरीही छोटा शेतकरी आणि शेतमजूर आहे तेथेच आहे. असे का? कारण कायदे कागदावरच राहिले त्याची अंमलबजावणी झालीच नाही म्हणून यापुढे एक दोन वर्षाच्या आत या सर्व कायद्यांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्याचा निर्धार आपण केला पाहिजे. आपण तसे काही करू शकलो तरच लोकांचा आपल्यावर विश्वास बसेल नाही तर ते वैफल्याने ग्रासले जातील मोठे जमीनदार आणि शेतकरी यांच्यात असंतोष दुमसत आहे. तो वेळीच नाहीसा केला नाही तर ग्रामीण भागात हिंसाचाराचे थैमान निर्माण होईल आणि हरितक्रांतीचे सारे फायदे नाहीसे होऊन जायला वेळ लागणार नाही. म्हणून जमीन वाटपाच्या प्रश्नांची ताबडतोब दखल घेतलीच पाहिजे याबाबतीत दिरंगाई वा चालढकल चालणार नाही.[9]

दैनिक केसरी 1971 मध्ये दिवाळी अंकासाठी मुलाखत देताना यशवंतराव चव्हाण जमीनधारणे संदर्भात म्हणतात हरितक्रांतीचा विचार करताना खेड्यातील श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी यांच्यातील वाढत्या विषमतेचा विचार हा आवश्यक ठरतो. आणि असा एकदा विचार करू लागलो, म्हणजे मग जमीन सुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचाही विचार ओघाने पुढे येतो. आज खेड्यात लक्षावधी भूमिहीन आहेत, शेतमजूर आहेत, कारागीर आहेत. ते रोजगारासाठी उद्योगांसाठी आणि जमिनीसाठी भुकेले आहे. त्यांच्याकडे लक्ष द्यावेच लागेल. अर्थात यासंबंधी निर्णय करताना जमिनीमधून अधिकाधिक उत्पादन कसे निघेल. शेतीसाठी आधुनिक तंत्रांचा वापर कसा करता येईल, याचाही विचार करावाच लागेल. खेड्यातून गेल्या काही वर्षात ज्या विकासाच्या योजना राबवल्या गेल्या, त्यांचा खरा फायदा सदन शेतकऱ्यांच्या पदरात पडला. छोटी शेतकरी आणि शेतमजूर हा वर्ग जवळ जवळ उपेक्षितच राहिला. अवतीभवती हरितक्रांती होत आहे, काही शेतकऱ्यांना विकास योजनांचा फायदा मिळून त्यांचे उत्पन्न वाढत आहे, ते संपत्तीमान बनत आहेत. पण या वाढत्या समृद्धीचा फायदा आपल्याला काहीही मिळत नाही. ही भावना छोटा शेतकरी आणि शेतमजू यांच्यात निर्माण झाली आणि ती वाढतच राहिली, तर त्यांच्यात वैफल्य वाढेल. खेड्यातील अर्थव्यवस्थेतील हे दोष दूर करा लागतील. एरवी पुढच्या काही वर्षात विषमता ही अशीच वाढत राहिली, प्रसंगी ती धारदार बनेल आणि त्यातून मग स्फोटक परिस्थि

निर्माण होईल. अलीकडे काही राज्यातून अशा स्फोटक परिस्थितीच्या घटना घडल्या आहेत. म्हणूनच जमीन सुधारणा व कमाल मर्यादा यांचा विचार कमप्राप्त ठरतो.[10]

## जमीन सुधारणा

जमीन सुधारण्याच्या संदर्भात यशवंतराव यांची मते ही पुरोगामी होती अर्थात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झालेला असल्यामुळे शेतीचे मूळ प्रश्न काय आहेत याविषयी त्यांना माहिती होती. जमीन सुधारण्याच्या शेतीमालाला भाव मिळावा ही मागणी पन्नास वर्षापूर्वीच यशवंतराव चव्हाण यांनी केलेली आपल्याला दिसून येते अर्थात त्या यशवंतराव चव्हाण म्हणतात की, शेतकऱ्याला त्याच्या शेतमाला बद्दल किमान वाजवी भाव मिळालाच पाहिजे हे आपल्या आर्थिक धोरणाचे एक प्रमुख सूत्र आहे शेतमालाचे उत्पादन वाढावे आणि उत्पादक व ग्राहक यांचे शोषण थांबावे. यासाठी काही नवी पावले उचलावी लागतील. त्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रात प्रमुख अन्नधान्याची घाव खरेदी करणे इष्ट ठरेल. अशी एखादी कार खरेदी सुरू झाली. तरच शेतकऱ्यांची पिळवणूक थांबू शकेल. काही राज्य सरकारांनी या दृष्टीने पावले टाकले आहेत. हे मला माहित आहे. काही राज्यांमधील शिलकी अन्नधान्य खरेदी करण्याबाबत अन्नधान्य महामंडळ पुढाकार घेत असते. परंतु एकेका वस्तूचा व्यापार सार्वजनिक क्षेत्रात घेऊन हा व्यापक प्रश्न सुटणार नाही. ग्रामीण भागातील उत्पादकांची परिस्थिती सुधारण्यासाठी गहू, तांदूळ, ज्वारी आणि इतर नगदी पिके यांची खरेदी सार्वजनिक शासन यंत्रणेमार्फत झाली पाहिजे हा आमच्या नव्या पुरोगामी आर्थिक धोरणातील आग्रहाचा भाग आहे. तेलबियांसारख्या इतर शेतमालाच्या व्यापारात श्रीमंत ठेकेदार अशा रितीने भाव बांधून घेतात की, त्यामुळे शेतकरी व ग्राहक या दोघांनाही नुकसान सोसावे लागते. म्हणून शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थाला आणि त्याच्या नफेबाजारीला मुळीच वाव राहणार नाही. अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हावयास हवी.[11]

**कोरडवाहू शेतीच्या प्रश्नासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात** की, आपण देशातील सारी जलसंपत्ती उपयोगात आणली, तरी देखील बराच मोठा भूभाग पाण्यापासून वंचितच राहणार आहे. आपण त्या कोरडवाहू शेतीचे काय करणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. तो सोडवला नाही, तर देशातील गरिबीचे आपण निर्मूलन करू शकणार नाही. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळूनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही. हे आपण पाहतच आहोत म्हणून यापुढे आपल्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बहुसंख्य उपेक्षित शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यावर विशेष भर दिला गेला पाहिजे. त्या दृष्टीनेच कोरडवाहू शेतीचा प्रश्न हाताळला पाहिजे. कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी खास कार्यक्रम संघटित केले पाहिजेत. तसेच अशा शेतामध्ये कोणती पिके घेता येतील, याचाही विचार व्हायला हवा. त्यासाठी आपल्याला कोरडवाहू शेतीचे नवे तंत्र विकसित करावे लागेल. ही शेती करणाऱ्यांना बी बियाणे आणि खते यांचा पुरवठा करण्याची आणि त्यांच्या मालाला सहकारी बाजारपेठ मिळवून देण्याची व्यवस्था करण्यासाठी वेगळ्या निधी उभारावा लागेल.[12]

## समारोप

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यामुळेच आधुनिक महाराष्ट्र घडला तसेच आधुनिक महाराष्ट्रातील आजचे प्रश्न व त्यावरील उत्तरे यशवंतराव चव्हाण यांनी पन्नास वर्षापूर्वीच मांडलेली होती असे आपणास दिसून येईल.



Scanned with OKEN Scanner

संदर्भ


1. विकिपीडिया - www.mnm.wikipidia.com
2. तळवलकर गोविंद - यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व मौज प्रकाशन गृह मुंबई पहिले आवृत्ती 2012 पुष्ट क्रमांक 32
3. चव्हाण यशवंतराव - यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णकाट प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1980 नवी आवृत्ती 1987 पुष्ट क्रमांक 123, 124
4. चव्हाण यशवंतराव - भूमिका प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1979 प्रथम आवृत्ती पुष्ट क्रमांक 94, 95
5. तळवलकर गोविंद - यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व मौज प्रकाशन गृह मुंबई 2012 पहिली आवृत्ती पुष्ट 124, 125
6. कित्ता - पुष्ट क्रमांक 122 123
7. चव्हाण यशवंतराव - सह्याद्रीचे वारे मौज प्रकाशन मुंबई 2012 चौथी आवृत्ती पुष्ट क्रमांक 64, 65
8. चव्हाण यशवंतराव - भूमिका प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1979 प्रथम आवृत्ती पुष्ट क्रमांक 88
9. कित्ता - पुष्ट क्रमांक 91, 92
10. कित्ता - पुष्ट क्रमांक 130
11. कित्ता - पुष्ट क्रमांक 89
12. कित्ता - पुष्ट क्रमांक 90,91.


Scanned with OKEN Scanner